पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरी सुविधा केंद्र,
क्र. नासुके/३/कावि/६१/२०१६
दिनांक २०/१२/२०१६

<u>विषय :- आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित अर्जाबाबत...</u>

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित तक्रार अर्ज करण्याची सोय महाराष्ट्र शासनाने आपले सरकार वेब पोर्टलवर दिनांक २६ जानेवारी २०१५ पासून सुरू करणेत आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक पसई/कावि/१२७०/२०१६ दिनांक ०९/११/२०१६ अन्वये आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे २१ दिवसाच्या आत निराकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर तक्रारींचे विहीत मुदतीत निराकरण केलेचे दिसून येत नाही. तसेच सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री स्वत: आढावा घेत असून प्रलंबित प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली असून तक्रार निवारणची कार्यवाही न करणाऱ्या संबंधित कार्यालयप्रमुखांवर नियमान्वये योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश देणेत आले आहेत.

सबब, महानगरपालिके संबंधित आपले सरकार द्वारे प्राप्त तक्रारींचे संबंधित अधिकाऱ्यांनी शक्य तितक्या लवकर २१ दिवसाच्या आत नागरीकांच्या तक्रारींचे निराकरण होईल याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत तक्रार निवारणाची कार्यवाही न करणाऱ्या संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, याची सर्व विभागप्रमुखांनी गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी — ४११०१८.

प्रति,

विभाग प्रमुख/शाखा प्रमुख
सर्व विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

सोबत — जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडील परीपत्रक.

५७

LR
२४-११

2342

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टेलिफोन नं २६१२३३७० फॅक्स नं. २६१२३०२८

क्र.पसई/कावि/१२५९/२०१६
पुणे दि. ०८/११ /२०१६

परिपत्रक

**विषय :- आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित अर्जाबाबत..**

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी दि.२६ जानेवारी २०१५ रोजी आपले सरकार हे पोर्टल सुरु केलेले आहे. मा.मुख्यमंत्री यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारीचे २१ दिवसात निराकरण होणे अपेक्षित आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रारींचे आपण विहित मुदतीत निराकरण केलेचे दिसून येत नाही.

आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई स्वतः आढावा घेत असतात. गेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये प्रलंबित तक्रारींबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून याबाबत विहित कालावधीत तक्रार निवारणाची कार्यवाही न करणा-या संबंधित कार्यालयप्रमुखावर नियमान्वये योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश जिल्हा प्रशासनास देणेत आलेले आहेत.

जिल्हा लोकशाही दिनाची बैठक मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी घेण्यात येते सदर बैठकीनंतर आपले सरकार पोर्टलवर प्रलंबित असणा-या तक्रारींचा आढावा घेण्यात येतो.

तरी मा.मुख्यमंत्री महोदय यांचा सदरचा विषय प्रथम प्राधान्याचा असून, नागरिकांच्या प्राप्त होणा-या तक्रारी २१ दिवसात निर्गत होणे अपेक्षित आहे. तरी आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत कालबध्द पध्दतीने नियोजन करुन जलद गतीने लवकरात लवकर निपटारा करणेची दक्षता घेणेत यावी.

संगणकीकृत नागरी सुविधा कक्ष
आवक क्र. १०१०
दिनांक २९/११/१६
टेबल क्र. ३
लिपिक
व. लिपिक
प्रशा. अधिकारी
सहा. आयुक्त

माहिती व तंत्रज्ञान विभाग
आवक क्रमांक- ४८२१
दिनांक- २२/११/१६
टेबल क्र.- ५/६५
लिपिक-

प्रशासन विभाग
पोस्टाचे टपाल
दिनांक: 19 NOV 2016
आवक क्र.- 2342
विभाग मा.त.
लिपीक
मु. लिपीक
प्रशासन अधिकारी:-
सह आयुक्त
अति. आयुक्त
आयुक्त:-

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रत :१) शाखाप्रमुख (सर्व)
२) उप मुख्य कार्य. अधिकारी
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
३) उ वि अ
४) तहसिलदार
५) खाते प्रमुख मा. पिंपरी-चिंचवड आयुक्त
पिंपरी पुणे-१८
सर्व विभागांना
Circulate
मा. मुख्य...